# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

## ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र

## गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल

अंक ०३ /२०२१ | दिनांक : ०८ /०१ /२०२१ | कालावधी ५दिवस

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०२ /०१ /२०२० ते ०८ /०१ /२०२१) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक ०९ /०१ /२०२१ सकाळी ८:३० पासून १३ /०१ /२०२१ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०२/०१ | ०३/०१ | ०४/०१ | ०५/०१ | ०६/०१ | ०७/०१ | ०८/०१ | | ०९/०१ | १०/०१ | ११/०१ | १२/०१ | १३/०१ |
| ० | ० | ० | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | १२ | २ | १ | ० | ० |
| ३० | २८ | २८ | २९.२ | २८.४ | ३० | ३१ | कमाल तापमान (अं.से) | २६ | २७ | २८ | २९ | २९ |
| २१ | २० | २०.२ | २० | १९ | १९ | १९ | किमान तापमान (अं.से) | २२ | २३ | २३ | २४ | २४ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | अंशत ढगाळ | मेघा छादित | अंशत ढगाळ | ढगाळ | मेघा छादित |
| ८६ | ७२ | ५६ | ८१ | ७९ | ६८ | ८६ | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ७६ | ७३ | ७० | ६० | ५५ |
| ७० | ५६ | ५६ | ६७ | ५३ | ५८ | - | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ४८ | ४४ | ४५ | ३२ | ३३ |
| .६ | २.९ | ५.७ | ३ | ६ | ६.१ | ४.५ | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ८ | ६ | ६ | ७ | ६ |
| पू. | पू. | पू. | ई पू. | ई पू. | - | - | वाऱ्याची दिशा | ई. | ई. | ई. | ई. | ई. |

| पाऊस (मिमी) मागील आठवडयातील | पाऊस (मिमी) १/१/२०२१ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ०.० | ०.० | ३११५.२ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| | |
|---|---|
| हवामान पूर्वानुमान | प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार दिनांक ९ जानेवारी ते ११ जानेवारी, २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी अतिशय हलका ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे, तसेच पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहील. |
| सामान्य सल्ला | दिनांक ९ जानेवारी ते ११ जानेवारी, २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी अतिशय हलका ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने परिपक्व झालेला भाजीपाला व फळे काढून घ्यावीत. तसेच किटक नाशके व कीड नाशकांची फवारणी पावसाचा अंदाज पाहून करावी. |
| संदेश | दिनांक ९ जानेवारी ते ११ जानेवारी, २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी हलक्या स्वरूपाच्या पावसाचशक्यता असल्याने वाळलेला चारा झाकून ठेवावा. |

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| तूर | काढणी अवस्था | दिनांक ९ जानेवारी ते ११ जानेवारी, २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी अतिशय हलका ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने तूर पिकाची काढणी करून घ्यावी व सुरक्षित ठिकाणी ठेवण्याची व्यवस्था करावी. |
| वाल | फुलोरा ते काढणी अवस्था | ढगाळ वातावरणामुळे वाल पिकामध्ये मावा किडीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास नियंत्रणासाठी प्रवाही डायमेथोएट ३० टक्के १२ मि. ली. प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **हरभरा** | **फुलोरा अवस्था** | ✚ हरभरा पिकावर घाटे अळीचा प्रादुर्भाव होवू शकतो, त्यामुळे घाटे आळीच्या नियंत्रणासाठी ५ % निंबोळी अर्क किंवा क्विनॉलफॉस २५ ईसी २ मिली प्रति लिटर पाण्यात मिसळून संध्याकाळच्या वेळेस फवारणी करावी. |
| **आंबा** | **बोंगे फुटण्याची अवस्था** | ✚ मोहोर फुटलेल्या ठिकाणी मोहोर संरक्षण वेळापत्रकानुसार तिसरी फवारणी मोहोर फुलण्यापूर्वी (दुसऱ्या फवारणी नंतर १५ दिवसांनी) इमिडाक्लोप्रीड १७.८ टक्के प्रवाही ६ मि. ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. त्यामुळे तुडतुडे, फुलकिडी तसेच मिजमाशीचे नियंत्रण होवू शकेल व त्याचा परपरागीकरण करणाऱ्या कीटकावर होणारा परिणाम टाळता येईल. तसेच फवारणीच्या वेळेस किटकनाशकाच्या द्रावणामध्ये भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी ५ टक्के हेक्झाकोनॅझोल ५ मि. ली. किंवा पाण्यात विरघळणारे ८० टक्के गंधक २० ग्रॅम प्रति १० लिटर या प्रमाणात वापरावे. |
| **चिकू** | **काढणी अवस्था** | ✚ दिनांक ९ जानेवारी ते ११ जानेवारी, २०२० दरम्यान तुरळक ठिकाणी अतिशय हलका ते हलक्या स्वरूपाच्या पावसाची शक्यता असल्याने परिपक्व झालेले चिकूची फळे काढून घ्यावीत. |
| **काजू** | **मोहोर अवस्था** | ✚ मोहोर अवस्थेत असलेल्या काजू पिकावर ढेकण्या व फुलकिडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. ही किड मोहोरातील रस शोषून घेते त्यामुळे मोहोर सुकून जात असून किडीच्या प्रादुर्भावामुळे मोहोराचे ढेकण्या व फुलकिडीपासून संरक्षण करण्यासाठी मोहोर फुटण्याच्या वेळी प्रोफेनोफॉस ५० टक्के प्रवाही १० मि.ली. प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **वाढीची अवस्था** | ✚ नारळावर स्पायरलींग व्हाईट फ्लायचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ५० मि.ली. कडूलिंब तेल /करंज तेल प्रती १० लिटर पाण्यात फवारावे. तसेच पानावर पडलेली काळी बुरशी घालवण्यासाठी स्टार्च २० ग्रॅम प्रति १० लिटर पांण्यात फवारावे. |
| **मोगरा** | **वाढीची अवस्था** | ✚ जानेवारी महिन्यामध्ये मोगरा झाडांची छाटणी केल्याने नवीन फुट वाढून फूल उत्पादनात वाढ होते. छाटणी करून १% बोर्डो मिश्रणाची फवारणी करावी किंवा कापलेल्या फांदीवर बोर्डो पेस्ट लावावे. |
| **काकडी** | **फुलोरा ते फळ धारणा** | ✚ पुढील पाच दिवस ढगाळ वातावरण असल्याने कारली, काकडी आणि दोडका यासारख्या वेलवर्गीय पिकावर भुरी रोग येण्याची शक्यता आहे. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारे गंधक २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **टोमॅटो** | **फुलोरा ते फळ धारणा** | ✚ ढगाळ वातावरण असल्याने टोमॅटो, मिरची आणि वांगी पिकावर भुरी रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. भुरी रोगाच्या नियंत्रणासाठी पाण्यात विरघळणारे गंधक २ ग्रॅम प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. |
| **मिरची** | **फुलोरा ते फळ धारणा** | ✚ मिरची, टोमॅटो आणि वांगी पिकामध्ये फळमाशी नियंत्रणासाठी एकरी ४ ते ५ फळमाशी सापळे लावावेत. |
| **कोबी** | **वाढीची अवस्था** | ✚ ढगाळ वातावरणामुळे मुळे कोबी पिकावर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून येण्याची शक्यता आहे, त्यासाठी कॉपर ऑक्सीक्लोराइड २.५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्युकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**

**ई-मेल :kvkkosbad439@gmail.com** **संपर्क:८५५२८८२७१२**

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई**

२) **मागील हवामान : भात संशोधन केंद्र, पालघर**

**ठिकाण** : **कृषि विज्ञान केंद्र पालघर**

**दिनांक : ०८.०१.२०२०**

**स्वाक्षरित**

**प्रमुख अन्वेषक,**

**ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**